आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र -दुपारी ३.०० वाजता

२५ एप्रिल २०२४ - गुरुवार

राज्यातल्या ८ लोकसभा मतदारसंघात उद्या दुसऱ्या टप्प्याचं मतदान होणार असून मतदानाच्या दृष्टीनं संबंधित मतदारसंघात जय्यत तयारी प्रशासनानं केली आहे. नांदेड लोकसभा मतदारसंघात निवडणूक कर्मचारी मतदानकेंद्रांकडे रवाना होत आहेत. या कर्मचाऱ्यांना नियुक्तीचे केंद्र, मतदान साहित्य दिलं जात असून उमेदवारांच्या प्रतिनिधींच्या उपस्थितीत वरिष्ठ अधिकारी कर्मचाऱ्यांकडे मतदान यंत्रं हस्तांतरीत करत आहेत. जिल्ह्यातल्या २ हजार ६८ मतदान केंद्रांसाठी १० हजार ६०० हून अधिक कर्मचारी नियुक्त करण्यात आले आहेत. मतदानाच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यात कडक पोलिस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे.

अकोल्यात मतदान केंद्रांसाठी नियुक्त करण्यात आलेली मतदान केंद्राध्यक्ष आणि मतदान अधिकाऱ्यांची मतदान पथकं आपापल्या नेमून दिलेल्या मतदान केंद्रांवर रवाना व्हायला सुरुवात झाली आहे. अकोला लोकसभा मतदारसंघातील ६ विधानसभा मतदारसंघाच्या ठिकाणाहून मतदान साहित्या वाटप केल्यानंतर मतदान पथके केंद्रांवर रवाना होत आहे. अकोला जिल्ह्यातल्या ८८२ ठिकाणी असलेल्या १ हजार ७१९ मतदान केंद्रांसाठी ६ हजाराहून अधिक पोलिस अधिकारी, कर्मचारी तैनात आहेत.

राज्यातल्या अकोला, हिंगोली, परभणी, नांदेड, यवतमाळ-वाशिम, अमरावती, वर्धा आणि बुलडाणा या मतदारसंघामधे मिळून २०४ उमेदवार या टप्प्यात नशीब आजमावत आहेत. या मतदारसंघातल्या मतदानाचा आढावा घेणारा विशेष रेडिओ ब्रिज कार्यक्रम ‘मतदानाचा मागोवा’ उद्या आकाशवाणीच्या अस्मिता वाहिनीवर सादर होणार आहे. रात्री सव्वा आठ पासून हा कार्यक्रम ऐकता येईल.

<><><><><>

लोकसभा निवडणुकीसाठीच्या चौथ्या टप्प्यासाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्याची मुदत आज संपत आहे. उद्या उमेदवारी अर्जांची छाननी होणार असून सोमवारपर्यंत उमेदवारी अर्ज मागे घेण्याची मुदत आहे. या टप्प्यात ९ राज्यं आणि एका केंद्रशासित प्रदेशातल्या मिळून ९६ लोकसभा मतदारसंघांमध्ये १३ मे रोजी मतदान होणार आहे. यात महाराष्ट्रात नंदूरबार, जळगाव, रावेर, जालना, छत्रपती संभाजीनगर, पुणे, मावळ, शिरुर, अहमदनगर, शिर्डी आणि बीड मतदारसंघात मतदान होईल.

**<><><><><>**

राष्ट्रवादी काँग्रेस शरच्चंद्र पवार पक्षाचा जाहीरनामा आज पुण्यात प्रसिद्ध झाला. शपथनामा नावाने प्रसिद्ध झालेल्या या जाहीरनाम्यात जातनिहाय जनगणना, कृषी कल्याण आयोगाची स्थापना, महिलांना नोकऱ्यांमधे ५० टक्के आरक्षण, शिकाऊ उमेदवार म्हणून नोकरीचा अधिकार, याबरोबरच जम्मू काश्मीरला राज्याचा दर्जा देण्याला पूर्ण पाठिंबा या मुद्द्यांचा समावेश आहे. एक देश एक निवडणूक या संकल्पनेला पक्षाचा विरोध असल्याचंही या जाहीरनाम्यात स्पष्ट केलं आहे. नागरिकत्व कायदा, राष्ट्रीय नागरिक नोंदणी,दहशातवादाविरोधातला युएपीए कायदा इत्यादी कायद्यांचा फेर आढावा घेऊन त्यात बदल करण्याचं आश्वासन पवार गटानं दिलं आहे.

**<><><><><>**

भाजपाचे ज्येष्ठ नेते नरेंद्र मोदी आणि काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी निवडणूक प्रचारसभेत आचारसंहितेचं उल्लंघन केल्याच्या तक्रारीची दखल केंद्रीय निवडणूक आयोगाने घेतली असून भाजपा आणि काँग्रेस पक्षाध्यक्षांना नोटीसा जारी केल्या

आहेत. येत्या २९ एप्रिल रोजी सकाळी ११ वाजेपर्यंत आपापले जबाब दाखल करायला आयोगाने सांगितलं आहे.

**<><><><><>**

श्रोतेहो, 'लोकनिर्णय महाराष्ट्राचा' या कार्यक्रमाच्या आजच्या भागात आपण सातारा लोकसभा मतदार संघाचा आढावा घेणार आहोत. संध्याकाळी सव्वा सात ते साडे सात वाजेपर्यंत आकाशवाणी मुंबईच्या अस्मिता वाहिनीवर आणि समाज माध्यमांवर हा कार्यक्रम ऐकता येईल.

**<><><><><>**

पहिल्या टप्प्यात मतदान झालेल्या नागपूर मतदारसंघात फेरमतदान घेण्याची मागणी ६ अपक्ष उमेदवारांनी केली आहे. नागपूरमधे काल संयुक्त पत्रकार परिषदेत या उमेदवारांनी ही माहिती दिली. नागपूरमध्ये मतदार यादीतल्या गोंधळामुळे ७ लाख लोकांना मतदान करता आलं नाही असा दावाही त्यांनी केला . भाजपा उमेदवार नितीन गडकरी यांनी आचारसंहितेचं उल्लंघन केल्यामुळे त्यांची उमेदवारी रद्द करण्याची मागणी करण्यात आली असून जिल्हा निवडणूक आयोगानं या तक्रारीची दखल घेतली नाही असंही त्यांनी यावेळी सांगितलं.

**<><><><><>**

उन्हाळी हंगामात मुंबईहून उत्तर भारतात जाणाऱ्या प्रवाशांची गर्दी लक्षात घेता, रेल्वे प्रशासनानं मुंबई आणि गोरखपुर दरम्यान धावणाऱ्या गाडीच्या २८ अतिरिक्त उन्हाळी विशेष फेऱ्या चालवण्याचा निर्णय घेतला आहे. त्यानुसार प्रवाशांच्या सोयीसाठी गोरखपुर आणि लोकमान्य टिळक टर्मिनस दरम्यान या गाडीच्या दोन्ही बाजूंनी एकूण २८ फेऱ्या होतील अशी माहिती रेल्वे प्रशासनानं दिली.

**<><><><><>**

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आज संध्याकाळी साडे सात वाजता हैद्राबाद इथं सन रायझर्स हैद्राबाद आणि रॉयल चॅलेंजर्स बंगलोर या संघात सामना होईल.

**//<><><><><>//**